■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस

मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ३८ ● मंगळवार, दि. ४ ते ११ फेब्रुवारी २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू

# देशाच्या खाद्यतेल गरज स्वयंपूर्णतेसाठी तेलबिया प्रक्रिया व मूल्यवर्धन क्रांतीची गरज

## कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचे प्रतिपादन

**रिसोड - कृषी विज्ञान केंद्र, वाशिमतर्फे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान (तेलबिया पीक), भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व कृषी तंत्रज्ञान तंत्र प्रयोग प्रसार संस्था, पुणे, अखिल भारतीय जवस व मोहरी संशोधन प्रकल्प, नागपूर आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने तेलबिया आदर्शगाव उपक्रमांतर्गत तेलबिया पिकाच्या उत्पादनवाढीला चालना देण्यासाठी जवस पीक शेती दिन व करडी पिक प्रक्षेत्र भेट कार्यक्रम २ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री. गजानन बाजड यांचे शेत, नेतनसा, ता. रिसोड, जि. वाशिम येथे आयोजित करण्यात आला.**




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. शरद गडाख, कुलगुरू, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक, पी. डी. के. व्ही. अकोला, तसेच मान्यवर म्हणून डॉ. नितीन कोष्टी, विभागप्रमुख, कृषी विस्तार शिक्षण विभाग, पी. डी. के. व्ही. अकोला, डॉ. रवींद्र काळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम, तसेच मार्गदर्शक तज्ञ डॉ. बिना नायर, प्रमुख, जवस व मोहरी पैदासकार संशोधन केंद्र, नागपूर, यांची उपस्थिती लाभली.

वैज्ञानिक व कृषी तज्ज्ञ उपस्थितीमध्ये यावेळी जवस व मोहरी संशोधन केंद्र, नागपूर येथील डॉ. स्वप्निल ठाकरे व डॉ. कामडी, तसेच कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे तज्ञ श्री. राजेश डवरे, तुषार देशमुख आणि डॉ. दिगंबर इंगोले उपस्थित होते.

कार्यक्रमातील महत्त्वाचे मुद्दे : डॉ. स्वप्नील ठाकरे यांनी कार्यक्रमाच्या उद्देशाची सविस्तर माहिती दिली व तेलबिया पीक उत्पादनातील नवीन तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. डॉ. बिना नायर यांनी जवस पीक आंतरपीक तंत्रज्ञानाद्वारे उत्पन्नवाढ आणि आर्थिक लाभ कसा साधता येईल, याविषयी माहिती दिली. डॉ. रवींद्र काळे यांनी शेती प्रयोगांद्वारे शेतकऱ्यांचा आर्थिक नफा वाढवणे आणि ग्रामीण भागातील सामाजिक स्थिरता राखणे हे कृषी संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले. डॉ. विलास खर्चे यांनी कृषी विद्यापीठ निर्मित तंत्रज्ञान व तंत्रप्रसाराच्या माध्यमातून उत्पादनवाढीवर भर देण्याचे आवाहन केले व कृषी विज्ञान केंद्र, वाशिमच्या कार्याची प्रशंसा केली. डॉ. शरद गडाख यांनी उत्पादन वाढीबरोबरच प्रक्रिया व मूल्यवर्धनाला प्राधान्य देऊन शेतकऱ्यांनी बाजारपेठेत अधिक मूल्य मिळवण्याच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन केले.

प्रात्यक्षिक व शेतकरी सहभाग : सर्व तज्ञ व शेतकऱ्यांनी जवस पीक वाण पीडीकेवी एन एल २६० आणि करडी पीक वाण आयएसएफ ७६४ यांची प्रत्यक्ष पाहणी केली व त्याच्या उत्पादनक्षमतेबद्दल माहिती घेतली. कार्यक्रमास नेतनसा, कवठा, केनवड, शेलू खडसे आणि एरंडा येथील अनेक प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री गजानन बाजड व केरळ येथील श्री खराटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. तुषार देशमुख यांनी तेलबिया उत्पादन वाढीसाठी प्रसारतंत्र हेच देशाच्या तेलबिया गरजेच्या स्वयंपूर्णतेचे मुख्य साधन आहे असे सांगत सर्व मान्यवरांचे व शेतकरी बांधवांचे आभार मानले.

# भारत प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात



रिसोड (ता. १ फेब्रु) : येथील भारत प्राथमिक मराठी शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात संपन्न झाला. मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांनी फित कापून व प्रत्येक स्टॉलला भेट देत मिळाव्याचे रीतसर उद्घाटन केले. या मेळाव्यात मांडण्यात आलेल्या २५ स्टॉलच्या माध्यमातून विद्यार्थी व शिक्षकांनी नाविन्यपूर्ण पाककृतींचा आस्वाद घेतला. आनंद मेळाव्यात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहाने चविष्ट व चटकदार खाद्यपदार्थ बनवून आणले. स्टॉलची मांडणी, विविध पदार्थांची विक्री, खरेदी व पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद मुलांनी लुटला.

'विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा तणाव दूर करुन विरंगुळा मिळावा व व्यावहारिक ज्ञानाबरोबरच त्यांच्यातील अंगीकृत सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने दरवर्षी आनंद मेळाव्याचे आयोजन केले जाते.' असे मुख्याध्यापिका किरणताई दुबे यांनी यावेळी सांगितले. सदर मेलाव्याच्या यशस्वीतेकरिता ज्येष्ठ शिक्षक पंजाबराव देशमुख, अनंत देशमुख, गौरव पतंगे यांनी विशेष यांनी परिश्रम घेतले.

# मराठा सेवा संघ रिसोडच्या वतीने ॲड.जगन्नाथ मुठाळ यांचा सत्कार



**रिसोड - वाशिम जिल्ह्यातील खडकी मुठाळ येथील रहिवासी असलेले ॲड.जगन्नाथ विठोबा मुठाळ यांची जिल्हा व सत्र न्यायाधीशपदी निवड झाल्यानिमित्त मराठा सेवा संघ रिसोडच्या वतीने त्यांच्या छोटेखानी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.**

ॲड.जगन्नाथ मुठाळ हे खडकी मुठाळ येथील रहिवासी असून सरकारी वकील म्हणून ते अमरावती येथे जिल्हा व सत्र न्यायालय येथे सरकारी वकील म्हणून कार्यरत आहेत. सोबतच कायदेविषयक मार्गदर्शक म्हणून विविध महाविद्यालय व विद्यापीठात ते मार्गदर्शन करत असतात. नुकतीच त्यांची जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून निवड झालेली आहे.या निमित्ताने मराठा सेवा संघाचे शिवश्री गजानन मानवतकर सर यांचे निवासस्थानी त्यांच्या छोटेखानी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी त्यांचे पुस्तक भेट देत अभिनंदन केले. यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष विजय बोरकर,विभागीय प्रवक्ता जानराव देशमुख सर,मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष शिवाजी कव्हर,दिलीप भिसडे,संतोष बिल्लारी,सतीश मोरे,सचिन देशमुख,विजय साखरे,गजानन मानवतकर,बबन कव्हर,साईनाथ शिंदे यांची उपस्थिती होती.

## महागाई रोखणार कधी ?

आज देशात भाज्या, धान्य, कडधान्य, भरड धान्य, औषधे, प्रवास, कपडे, शिक्षण, घरभाडे आदी सारेच महाग होत चालले आहे, झाले आहे. याचा फटका गृहिणींना मोठ्या प्रमाणावर बसतो. भाजीपाला, फळे, खाद्यतेल आणि पेयांच्या कडाडलेल्या किमतीमुळे किरकोळ महागाईने ६ टक्क्यांची सहिष्णुता पातळी ओलांडली आहे. बहुतेक वेळा दुकानदार मंडळी साठेबाजी करून धान्याची कृत्रिम टंचाई निर्माण करतात आणि शेतक-यांना व ग्राहकांना वेठीस धरतात. सरकारने या भाववाढीवर आपला अंकुश ठेवला तरच सामान्य जनतेला दिलासा मिळेल. पण तसे काही होणार नाही कारण सरकार सध्या इलेक्शन मोडवर आहे. अन्नधान्याच्या किमतीत वाढ झाल्याने गत ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईचा दर ६.२१ टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर गेला. सध्या बाजारात भाज्या, टोमॅटो, लसूण, कांदा, बटाटा, खाद्यतेलाचे भाव कडाडले आहेत. महागाईचा मार सहन करणा-या जनतेला आता आपल्या प्रश्नांची जाण कुणाला आहे, कुणाला नाही याचा सारासार विचार करून २० नोव्हेंबरला आपला मतदानाचा हक्क बजावावा लागणार आहे. सध्या राजकारणी मंडळी 'बटेंगे तो कटेंगे', 'एक है तो सेफ है'च्या कैफात मग्न आहे. खाद्यान्नांच्या किमतीतील वाढीने ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईदर ६.२१ टक्क्यांच्या चिंताजनक पातळीवर गेल्याचे मंगळवारी अधिकृत आकडेवारीद्वारा स्पष्ट करण्यात आले. या दराने १४ महिन्यांचा उच्चांक नोंदवत रिझर्व्ह बँकेसाठी सहनशील सहा टक्क्यांच्या सर्वोच्च पातळीला छेद मिळाल्याने बँकांच्या व्याजदरातील कपातही लांबणीवर जाणार असे दिसते. सर्वसामान्यांच्या रोजच्या अन्नाचा महत्त्वाचा भाग असणा-या भाजीपाला आणि खाद्य वस्तूंचे कडाडलेले दर हे महागाईवाढीस कारणीभूत ठरले असून याचे कारण सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाई दराने नऊ महिन्यांच्या उच्चांकी साडेपाच टक्क्यांची पातळी गाठली होती. ऑक्टोबर २०२३ मध्ये ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित हा महागाई दर ४.८७ टक्के होता. मागच्या महिन्यात लांबलेल्या पावसामुळे टोमॅटोसह भाजीपाला व कृषी-जिनसांच्या कडाडलेल्या किमतीमुळे खाद्यान्न महागाईचा भडका उडाला. सध्या बाजारात कांदा आणि लसणाचा तुटवडा निर्माण झाला आहे. कांदा ८० ते १०० रुपये किलो तर लसूण ४०० रुपये किलोवर गेला आहे. जेवणाला चविष्ट बनवणारे हे दोन महत्त्वाचे जिन्नस गायब झाल्याने सर्वसामान्यांच्या जिभेची चवच हरवली आहे. कांदा आणि लसणाच्या तुटवड्यामुळे त्यांच्या किमती वाढल्या आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर हा प्रकार घडल्याने राजकारणी मंडळी धास्तावली आहे. कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा व लसणाची आवक रोडावल्याने तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे पुढील महिनाभर कांद्याचे आणि तीन-चार महिने लसणाचे भाव चढेच राहण्याची शक्यता आहे.

## रिसोड बाजार समिती कडुन अपघातग्रस्तांना मदत



**रिसोड :** रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीत २६ जानेवारी २०२५ ला प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ध्वजवंदन झाल्यानंतर बाजार समितीचे लायसनधारक हमाल स्वर्गीय लक्ष्मण कैलास गायकवाड यांचा अपघाती मृत्यू झाला होता. त्यांचे परिवाराला बाजार समितीकडून त्यांची आई सिंधुबाई कैलास गायकवाड यांना २० हजार रुपयांचा धनादेश बाजार समितीकडून देण्यात आला.

त्याचबरोबर अपघातामुळे अपंगत्व आलेले लायसन धारक हमाल दिनेश दिलीप खडसे यांना बाजार समितीकडून दहा हजार रुपयांची मदत देण्यात आली. बाजार समितीमध्ये सभापती विष्णुपंत भुतेकर यांचे हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी कार्यक्रमासाठी कृ. उ. बाजार समितीचे संचालक गजानन पाचरणे, पुरुषोत्तम तोष्णीवाल, रवींद्र चोपडे, गजानन अवताडे, भगवान गाडे, भाऊराव पाटील गरड, रामचंद्र नाना बुधनेर, रमेश गायकवाड, भीमराव शेजुळ यांचा सह सचिव विजय भीमराव देशमुख, प्राचार्य विजयरावजी तुरुकमाने, डॉक्टर जितेंद्र गवळी, भागवतरावजी गाभणे, डॉक्टर सौ तृप्ती गवळी, सौ. निर्मलाताई विष्णुपंत भुतेकर, राजू पाटील डांगे, पुरुषोत्तम रंजवे, विकास झुंगरे, महावीर ठाकूर, संतोष शिकची, भीमराव खोडके, पंढरी पाटील नरवाडे, विष्णू सरकटे, रवी जाधव, नितीन गाडे, वैजनाथ रंजवे, जालिंदर देवकर, गजानन सदर, शितल धांडे, सतीश मांदळे, शंकर सदार, हरिभाऊ बाजड यांच्यासह बाजार समितीचे सर्व कर्मचारीवृंद, व्यापारी, आडते, हमाल, मापारी व खरीदार तथा बाजार समिति कार्यक्षेत्रातील शेतकरी व भूमिपुत्र चे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (श. प्र)

**पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक )**

I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# वाढत्या चोऱ्या रोखण्यास रिसोड पोलीस प्रशासन अपयशी!

## पोलीस यंत्रणेला चोरट्याचे खुले आव्हान



वाढत्या चोरा रोखण्यासाठी रात्रीची गस्त अत्यंत कडक असणे गरजेचे आहे.यासह बस स्टँड वर चोरांचा अत्यंत सुळसुळाट असल्याचे दिसते. बस स्टँड वर गोरगरीब कष्टकरी व शेतकरी मजुरांचे दागिने व रोख रक्कम चोरी जात आहेत.यामुळे बस स्टँड वर कायमस्वरूपी पोलीस कर्मचारी असणे आवश्यक आहे

**रिसोड** सध्या चोरट्यांनी पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले असून एकट्या रिसोड शहरात महिन्याभरात अनेक चोरीच्या घटना घडल्या असून विविध भागात चोरांनी हैदोस घातला आहे गेल्या महिन्याभरात रिसोड शहरात अनेक चोरीच्या घटना घडल्या आहेत घरासमोरील वाहन , बस स्टॅन्ड वरून रक्कम व दागदागिने चोरी , घरफोडी , तर एकाच रात्रीत तीन दुकान फोडून चोरट्यांनी लाखो रुपये लंपास केले त्यामध्ये दि २८ डिसेंबर रोजी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर मधील सुधाकर रामभाऊ भुतेकर यांची स्विफ्ट डिझायर कारच अज्ञात चोरट्यांनी लंपास केली त्यानंतर दि १ जानेवारी रोजी रिसोड येथील बस स्थानकामधून दुपारी १ वाजता बस मध्ये चढत असताना जयश्री विजय खराटे ही महिला हिंगोलीला जात असताना तिच्या जवळ एक मोठी पर्स होती त्यामधील छोट्या पर्स मधील ८ हजार रुपये व एक मंगळसूत्र असे एकूण ३३ हजार रुपयांचा एवढच चोरट्यांनी लंपास केला तर दि ८ जानेवारी रोजी हिंगोली रोड वरील दुकानासमोरून पार्श्वनाथ माधवराव गुंगे यांच्या मालकीची पारस ट्रेडर्स दुकानासमोरून चार चाकी मालवाहू गाडी रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी लंपास केली तर दि १३ जानेवारी रोजी रात्रीच्या वेळेस रिसोड शहरातील बस स्टँड जवळील दिपक रुथडा महाराज यांच्या घरातून देवाच्या सहा मुर्त्यासह कुत्र्याचे पिल्लू असा एकूण ७५ हजार रुपयाचा ऐवज चोरट्यांनी रात्री दरम्यान लंपास केला तर रिसोड शहरातील वाशिम मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज नगर भागातील एकाच रात्री तीन दुकाने फोडून साडेतीन लाख रुपयाचा चोरट्यांनी डल्ला मारला त्यानंतर दि ३१ जानेवारी रोजी सकाळी पावणे बाराच्या सुमारास प्रल्हाद तानाजी काळजाते वय ६५ राहणार भर जहागीर वाशिमला पैसे नेऊन देण्यासाठी जात असताना रिसोड बस स्थानक मधून बस मध्ये चढत असताना नगत रोख रक्कम असलेले ५0 हजार अज्ञात चोरट्यांनी बसमध्ये चढत असताना खिशातून प्रसार केले त्यामुळे चोरावर पोलिसांचे कुठलेही वचक राहिलेली दिसत नाही तर या दीड महिन्यात चोरीच्या घटनेत वाढ होताना रिसोड शहरासह तालुक्यात दिसून येत आहे त्यामुळेच सामान्य जनतेतून असे बोलल्या जात आहे की रिसोड पोलीस प्रशासन वाढत्या चोऱ्या रोखण्यास अपयशी ठरत आहे .

# पोलिस विभागाच्या वतीने भव्य रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन

## १०७ कंपन्या मध्ये १०१६ तरूणांना मिळाला रोजगार,

**वाशीम - जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि युथ हब स्किल मॅनेजमेंटच्या वतीने दिनांक १ फेब्रुवारी रोजी उमंग' एक संधी स्वप्नपूर्तीची 'उमंग' एक पाऊल स्वप्नपूर्तीचे या अंतर्गत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन हॅप्पी फेसेस शाळेच्या मैदानात यशस्वी आयोजन करण्यात आले.**







या मेळाव्यासाठी जिल्ह्यातील १११० २ तरुणांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. त्यापैकी जवळपास ४९५० तरुणांनी या रोजगार मेळाव्याला उपस्थिती लावली होती. या मुलाखतीमधून १०१६ जणांना नियुक्तीपत्र देण्यात आले व ३८४९ व्यक्तीना कंपनीमध्ये शॉर्ट लिस्टेड करून मुलाखती साठी बोलवण्यात आले. दिव्यांग बांधवांपैकी तीन दिव्यांग बांधवांना दोन लाख रुपये वार्षिक पगाराची नोकरी देण्यात आली. तसेच फायनन्स क्षेत्रामध्ये ३,४०,००० किमतीचे पॅकेज एका विद्यार्थ्याला देण्यात आले या मेळाव्यासाठी सकाळी आठ वाजल्यापासून सुशिक्षित तरुण - तरुणीची रिघ लागली होते, हॅप्पी फेसस शाळेचा संपूर्ण परिसर तरुण-तरुणीनी फुलून गेला होता. या मेळाव्याचे पोलीस प्रशासनाने उत्कृष्ट नियोजन केले होते. मेळाव्यासाठी आलेल्या उमेदवारांना मुख्य द्वारा जवळच नोंदणी फार्म वाटप करण्यात येत होते त्यानंतर त्यांना बसण्यासाठी मोठा सभा मंडप होता या ठिकाणी सुनियोजित शैक्षणिक पात्रता नुसार ५० - ५० च्या ग्रुपने या उमेदवारांना हॅपी फेस शाळेमध्ये पाठवण्यात आले होते, तेथे शैक्षणिक पात्रतेनुसार कोणत्या कंपनीमध्ये कोणत्या उमेदवाराला पाठवायचे हे ठरवून प्रत्येक उमेदवाराला संभाव्य नोकरीसाठी पाच पर्याय उपलब्ध करून देण्यात येत होते. तेथे हे तरुण मुलाखत देऊन पात्र ठरल्यानंतर त्या कंपनीकडून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात येत होते. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे व जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनात अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलिस अधिकारी नवनीत अग्रवाल, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण महाले, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, वाशिम शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार देवेंद्र सिंग ठाकूर, एपीआय भरत लसंतरे, पो.नि.खेरडे, पो. नि.वाघ, पो.नि.वाघटकर, पो. नि.किशोर शेळके, पो.नि.संतोष शेळके, सपोनी गणेश हिवरकर पोलीस उपनिरिक्षक राहुल चौधरी, पोलीस अमलदार बाळू कंकाळ, म्हात्रे, गजानन गोटे आदींनी परिश्रम घेतले..

### (पोलिसांचा चोख बंदोबस्त)

या संपूर्ण मेळाव्याचा चोख बंदोबस्त पोलिसांच्या वतीने करण्यात आला होता वाहनांची पार्किंग, पालकांना रोजगार मेळाव्यात असलेली प्रवेश बंदी, येणाऱ्या रोजगार इच्छुक तरुणांची तीन टप्प्यांमध्ये केलेली छाननी, जवळपास ६४ हॉलमध्ये उमेदवाराच्या मुलाखतीचे केलेली सोय, जागोजागी पिण्याच्या पाण्याची सोय, कागदपत्र झेरॉक्स करण्यासाठी झेरॉक्स मशीनची उपलब्धता त्याबरोबर इतर मूलभूत सोयी सुविधा यामुळे हा रोजगार मेळावा यशस्वी झाला.

**या रोजगार मेळाव्यात ज्यांना रोजगार उपलब्ध झाला नाही अशा ५६० तरूणांना पोलीस प्रशासनाच्या वतीने एक जॉब कार्ड प्रदान करण्यात आले असून ह्या जॉब कार्ड च्या माध्यमातून पुढील सहा महिन्यापर्यंत या सुशिक्षित तरुणांना रोजगार मिळवून देण्याची संधी उपलब्ध होणार आहे.**

### (युथ हब स्किल मॅनेजमेंटचे परिश्रम)

या संपूर्ण मेळाव्यामध्ये पोलीस प्रशासनासोबत युथ स्किल मॅनेजमेंटचे संचालक दीपक पवार किरण राहणे आणि मीनल मॅडम यांनी परिश्रम घेत संपूर्ण तरुणांना मार्गदर्शन केले. तसेच या ठिकाणी राज्यातील १०७ कंपनीचे एच आर ची उपलब्धता करण्यात येऊन तरुणांना रोजगार देण्यात यशस्वी झाले.

### ( नियुक्तीपत्राचे झाले वाटप)

या मेळाव्यात दुपारी बारा वाजेपर्यंत जवळपास ३०० उमेदवारांना जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलिस अधिकारी नवनीत अग्रवाल, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण महल्ले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

